# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 24/04/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

**नागपूर – भंडारा महामार्गावर रेतीची बेकायदेशिर वाहतुक करणारे सात(7) टीप्पर पोलीसांनी घेतले ताब्यात.**
**(स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची रात्रीचे वेळेस पोलीस स्टेशन मौदा हद्दीत धडक कार्यवाही)**

मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, नागपूर जिल्हा ग्रामीण यांनी त्यांचे अधिनस्त नागपूर ग्रामीण पोलीस दलास अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांविरूध्द कार्यवाही करण्याकरिता आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे विवीध पथकांना अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांविरूध्द सातत्याने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिनांक 24/04/2021 रोजी पहाटे 04:00 वाजताचे दरम्यान पोलीस ठाणे मौदा हद्दीतील नागपूर–भंडारा महामार्गावर गस्त करित असतांना, माथनी टोल नाका जवळ, नागपूर भंडारा महामार्गावर नागपूरचे दिशेने येत असलेल्या सात टीप्परला थांबवुन पाहणी केली असता, त्यामध्ये रेती या गौण खनीजाची क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात वाहतुक होतांना दिसुन आल्याने, वजन काटयावर सर्व टीप्परचे रेतीसह वजन करून क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतुक होत असल्याबाबत खात्री करण्यात आली. ताब्यात घेण्यात आलेल्या सातही टीप्परवर व त्यांचे मालकांविरूध्द प्रादेशिक परिवहन विभागामार्फत तसेच महसुल विभागामार्फत कायदेशिवर कार्यवाही करिता पोलीस ठाणे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

कार्यवाही करण्यात आलेल्या टीप्परचे व त्यांचे चालक–मालकांचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| अनु. क्रमांक | ट्रक क्रमांक | मालकाचे नाव | चालकाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | MH 49 AT 4446 | लहु सखाराम रोहनकर, वय 45 वर्ष, रा. म्हाळगी नगर, हुडकेश्वर पुलाजवळ, नागपूर. | एहसान इसराईल खान, वय 24 वर्ष, रा. रोशनबाग, खरबी, नागपूर. |
| 2 | MH 40 BL 7937 | दिपक बबनराव झोडे, वय 29 वर्ष, रा. सावळी अम्मा दर्गा जवळ, दिघोरी, नागपूर. | अंकुश गोपीचंद खोब्रागडे, वय 22 वर्ष, रा. निंबा, पाचगाव, ता. कुही, जि. नागपूर. |
| 3 | MH 40 BL 7339 | प्रज्वल विठ्ठल आंभोरे, वय 24 वर्ष, रा. आजनी, पोस्ट कळमना, ता. कुही, जि. नागपूर. | विजय वासुदेव तुमडाम, वय 30 वर्ष, रा. आकोली, ता. कुही, जि. नागपूर. |
| 4 | MH 49 AT 5185 | स्वप्नील चंद्रकांत ठाकरे, रा. गणेशपेठ, नागपूर. | महेश नथ्थुजी सडमीके, वय 30 वर्ष, रा. उटी, पोस्ट. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर. |
| 5 | MH 40 AK 7263 | यशवंत विश्वनाथ रोकडे, वय 25 वर्ष, रा. अंबाझरी, नागपूर. | सिध्दार्थ ताराचंद बागडे, वय 32 वर्ष, रा. भांडेवाडी, पारडी, नागपूर. |
| 6 | MH 40 BG 9334 | जमीर हफीज खान, वय 42 वर्ष, रा. साईबाबा नगर, खरबी चौक, नागपूर. | टेकराम अशोक कुथे, वय 26 वर्ष, रा खरबी चौक, नागपूर. |
| 7 | MH 40 BG 3572 | कादीर मोहम्मद कुरेशी, वय 45 वर्ष, रा. हसनबाग, पहीली लाईन, नागपूर. | सलीम शहाबुद्दीन शेख, वय 32 वर्ष, रा. कळमना नागपूर. |

तरी सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, हेकॉ विनोद काळे, नापोशि शैलेश यादव, सत्याशिल कोठारे, पोशि प्रणय बनाफर, विरेंद्र नरड व चा.सफौ. साहेबराव बहाळे यांनी पार पाडली आहे.

 

फसवणुक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 18 कि मी अंतरावर पिंपळगाव येथे दिनांक 17/04/2021 चे 15.00 वा. 16.00 वा. सुमारास अज्ञात आरोपी, रा. पश्चिम बंगाल याने त्याच्या मोबाईल व्दारे फिर्यादी वय 32 वर्षे यांचे मोबाईल वर फोन करून म्हटले की, ''मॅडम आपके फोन पे कॅश बॅक आया है आपने रिसीव्ह क्यों नही किया''? त्यावर फिर्यादीने सांगितले की, ते पाहिले नाही तसेच फिर्यादीने नेटपॅक नाही असे सांगितले त्याने फिर्यादीला 16 अंकी नंबर बताओ असे सांगितले त्यावरून फिर्यादीने 16 अंकी नंबर सांगितले नाही. तेंव्हा आरोपीने फिर्यादीला फोन पे ओपन करण्यासाठी सांगितले म्हणुन फिर्यादीने, तिचे पतीचे मोबाईल क्रमांकाच्या मदतीने फिर्यादीचे मोबाईलवर वॉट्सअपच्या मदतीने फोन पे ओपन करुन पाहिले असता कोणतेही नोटीफिकेशन आले नव्हते. फिर्यादीने तसे सांगितले त्यावर सदर अरोपी मोबाईल धारक याने ''माय प्राफाईलवर जावुन माय युपीआय आय डी ओपन करुन @ybl available '' वर क्लिक करण्यास सांगितले. फिर्यादीने तसे केले असता 4,999/–रु. चा नोटीफिकेशन मॅसेज आला त्यावर त्याने क्लिक करण्यास सांगितले असता फिर्यादीने क्लिक केले असता व्हॅलीड पीन नंबर मागितल्याने फिर्यादीने पीन एंटर केला. फिर्यादीचे मोबाईल क्रमांकावर 4,999/–रु. सक्सेसफुल असा मेसेज आला. तीच प्रोसेस 05 वेळा करण्यास सांगितले 05 वेळेस करण्याचे कारण की, इंटरनेट नाही असे फिर्यादीला सांगितले. फिर्यादीने तसे 05 वेळा पीन एंटर करण्याची सक्सेसफुलची प्रोसेस 05 वेळा केली व कंटाळुन फिर्यादीने फोन कट केला व बॅक बॅलंस एसबीआय अकांउट शाखा मौदा अकाउंट नंबर 32290828998 मधुन 25,000/–रु कमी केले आहेत असे दिसले. फिर्यादीने नंतर फोन केला व ''मी तुमची पोलीस कंम्प्लेन्ट करते'' असे म्हटले असता सदर मोबाईल धारक याने सांगितले की, ''मी पैसे कट केले नाही, तुम्ही चुकी केल्याने तुमचे पैसे कट झाले आहे मी तुमचे पैसे परत देतो'' त्यानंतर त्याने फिर्यादीचे 19,996/–रु परत केल्याचा नोटीफिकेशन पाठविला व आधीची प्रोसेस करण्यास सांगितली फिर्यादीने ती सेम प्रासेस दोनदा केली नंतर त्याने फिर्यादीस 9,998/–रु चा नोटीफिकेशन मेसेज पाठविला व फिर्यादीने सेम प्रोसेस केली त्यानंतर त्याने फिर्यादीस सांगितले की, दि 18/04/2021 चे सकाळी 10.00 पर्यंत तुमचे पुर्ण पैसे तुमच्या आकांउटवर जमा होतील असे म्हणुन त्याने फोन कट केला. फिर्यादीने अकाउंट बॅलंस चेक केला असता अकाउंट मधुन 65,000/–रु कमी झाल्याचे फिर्यादीचे लक्षात आले. त्याच दिवशी 07.30 वा. दरम्यान आरोपीला फोन केला असता ''मॅडम तुमचे पैसे उदया सकाळी 10.00 पर्यंत तुमचे अकाउंटवर जमा होतील'' असे सांगितले दि. 18/04/2021 रोजी फिर्यादीने सदर आरोपीला कॉल केला असता फोन बंद आहे करिता सदर आरोपीने फिर्यादीची ऑनलाईन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहलकम 66 18 (सी) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. अशोक कोळी 96578 11111 हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलिस स्टेशन देवलापारची कार्यवाही

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर मौजा मानेगाव टेक ते करवई येथे दिनांक 23/04/2021 चे 12.30 वा. ते 13.15 वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ तारसा नाल्याजवळ जावून नाकाबंदी करुन एमएच–31/सिएस– 3408 क्रमांकाच्या महिन्द्रा झायलो गाडीला थांबवुन तपासणी केली असता गाडीमध्ये एकुण 05(गाई) कि. 50,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. घटनास्थळावरून 05 जनावरे व वाहनासह एकुण किंमती 3,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे मपोउपनि लक्ष्मी घोडके, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1),डी, एफ, एम प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. केशव पुंजरवाड 8668865203 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी रामटेक विभाग श्रीमती नयन अलुरकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री प्रविण बोरकुटे, पोउपनि श्री केशव पुंजरवाड, मपोउपनि लक्ष्मी घोडके, पोशी जाधव, रमेश खरखटे व चालक पोलिस नाईक राजेश सोनटक्के यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर